Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,
ई बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.म/लेखा-११/3361
पुणे – ४११००४
दिनांक - 10/०८/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय:-** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मंडळ मान्यता नोंदणीशुल्क लिंक उपलब्ध करून देण्याबाबत..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात येते की, सन २०२५-२६ पासून शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांचे नोंदणी शुल्क (Registration fee ) भरण्याची प्रक्रिया online करण्यात आली आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नोंदणी शुल्क (Registration fee) राज्यमंडळाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर दिनांक २७/०७/२०२६ पासून प्रचलित पद्धतीने शुल्क भरणा करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१) संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून मार्च २०२६ परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे.
२) दि १५ ऑगस्ट २०२६ नंतर प्रचलित पद्धतीनुसार दंडात्मक शुल्कासह नोंदणी शुल्क online पद्धतीने भरणा करावयाचे आहे.

फेब्रु /मार्च २०२६ परीक्षेची नियमित विद्यार्थी संख्या गृहीत धरून मान्यता शुल्काचा तपशील खालील तक्त्याप्रमाणे आहे.

| अ.क्र | विद्यार्थी संख्या | १० वी नोंदणी शुल्क | १२ वी नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते १०० विद्यार्थ्यांपर्यंत | रु १०००/- | रु १०००/- |
| २ | १०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांसाठी | रु २००/- | रु ४००/- |

वरील प्रमाणे विहित मुदतीत इ १० वी व १२ वी मंडळ मान्यता नोंदणी शुल्क भरणा न केल्यास खालील प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र. | दिनांक | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १ | १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६ | रु २००/- |
| २ | ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ | रु ३००/- |
| ३ | ०१ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदन पत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रु ५००/- |

३) सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यांना मंडळामार्फत दरमहा शिक्षण संक्रमण अंक छापील स्वरुपात देण्यात येत होता. या पुढे जुलै २०२६ पासून शिक्षण संक्रमण अंक Digital स्वरुपात विनाशुल्क मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून शिक्षण संक्रमण शुल्क रुपये ५००/- घेण्यात येऊ नये.

उपरोक्तबाबत सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्याल यांना आपल्या स्तरावर अवगत करून देण्यात यावे. सदर प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ,पुणे

क्र.कोविमं/लेखा/नो.शु./ 2811
दिनांक :- 12 AUG 2026

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय : सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाकरिता मंडळ मान्यता नोंदणी शुल्क लिंक उपलब्ध करुन देण्याबाबत..**

राज्य मंडळ कार्यालयाकडून प्राप्त उपरोक्त पत्रानुसार नोंदणी शुल्क भरण्याबाबत सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी प्राधान्याने कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**प्रत माहितीस्तव :** मा.सचिव, राज्य मंडळ, पुणे.